# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फो· ०९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०७/०४/२०२०

### जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०७/०४/२०२० ते ०११/०४/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 40 | 41 | 40 | 38 | 39 |
| किमान तापमान (अं.से.) | 25 | 25 | 24 | 24 | 25 |
| ढग स्थिती (आकाश) | 1 | 0 | 0 | 0 | 0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 66 | 66 | 59 | 50 | 46 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 30 | 31 | 33 | 24 | 20 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 9 | 9 | 8 | 6 | 3 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 291 | 272 | 296 | 267 | 189 |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खा-त्याच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १० व ११ एप्रिल २०२० रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून दिनांक ७ ते ९ एप्रिल २०२० रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | तुरळक ठिकाणी पाऊसाची शक्यता असल्याने काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत. पाऊसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे. काढणी केलेली रब्बी ज्वारी, गहू, हरभरा ई. धान्य उन्हात चांगले वाळवावीत व सुरक्षित स्थळी साठवणूक करावी. जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत. पावसाचा अंदाज बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| Covoid 19 ya संसर्गजन्य आजार पासून रक्षण | | **Covid-19** या संसर्गजन्य आजारापासून संरक्षण करण्यासाठी तोंडास मास्क लावा, शेताच्या कामादरम्यान लोकांमध्ये संपर्क टाळण्यासाठी **3-5** फूट अंतर ठेवा समुदायामध्ये जवळजवळ एकत्र येऊ नका. हात वारंवार साबणाने धुवून सॅनिटायझर वापरा. उघडे खुले शिंकने टाळा तोंडावर रुमाल धरा आणि कोरो ना **Covid-19** प्रसार रोख्यासाठी प्रशासनास मदत करा. आपल्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी हात धुवा, स्वच्छता राखा, प्रवास टाळा आणि स्वतःची काळजी घ्या. |
| ऊस | वाढीची | सुरु उसाची लागण झालेल्या क्षेत्रात पिक ४ महिन्याचे होई पर्यंत खुरपणी व कोळपणी करून तण विरहीत ठेवावे. उन्हाळा चालू झाल्याने उसाला योग्य वेळेच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. |
| भुईमुग | आ-या सुटण्याची ते शेंगा पोसण्याची अवस्था | उन्हाळी भुईमूगाच्या आ-या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करु नये. आ-या जमिनीत जाण्याच्या वेळी ते शेंगा पोसण्याची कालावधीत पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी. भुईमुगास शक्य असल्यास स्प्रिंकलर पद्धतिने पाणी द्यावे. भुईमुगास जमिनीच्या मगदूरा प्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. टिक्का रोग नियंत्रणासाठी मॅंकोझेब २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यातून फवारावे. |
| भाजीपाला | पिक वाढीची अवस्था | भेंडी, वांगी, भोपळा इ. भाजीपाला पिकावरील रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा फिप्रोनिल २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच भाजीपाला पिकावरील कोळीच्या नियंत्रणासाठी फेनप्रोप ॅथ्रीन ३०% ई.सी., ५ मिली किंवा डायकोफॉँल १८.५% ई.सी., २० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| मिरची | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे मिरची पिकावर चुरडा-मुरडा: हा विषाणूजन्य रोग पांढरी माशी व फुलकिडे या किडींमार्फत होऊ शकतो. यामध्ये पिकांची पाने बारीक वाकडी होऊन सुरकुत्या पडल्यासारखी निस्तेज दिसतात. त्यामुळे झाडांची वाढ खुंटते. आवश्यकतेनुसार पांढरी माशी नियंत्रणासाठी पिवळे तसेच फुलकिड्यांसाठी निळे चिकट सापळे वापरावेत. |

| | | |
|---|---|---|
| | | रासायनिक कीडनाशकांचा वापर करावयाचा झाल्यास फुलकिडे नियंत्रणासाठी फिप्रोनील (५ ई.सी.) १५ मिली किंवा स्पिनोसॅड (४५ ई.सी.) ४ मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| टोमॅटो | फळधारण अवस्था | टोमॅटो वरील फळे पोखरणारी अळी – ही अळी प्रथम पाने खाते व नंतर हिरवी किंवा पिकलेली फळे पोखरून आत शिरते व गर खाते या किडीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी २० मिली किंवा नोव्हॅलीरॉन १० % ईसी १५ मिली किंवा क्लोरॅनट्रॅनीप्रोल १८.५% एस.सी ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून ८ ते १० दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या कराव्यात. |
| आंबा | फळधारण अवस्था | नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना वाऱ्यापासून संरक्षणासाठी काठीचा आधार द्यावा. मोठ्या झाडांना फळधारणेनंतर जमिचा प्रकार, झाडाचे वय, पाण्याची उपलब्धता ई. विचारात घेवून योग्य वेळेच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. बागेत झाडांच्या आळ्यांमध्ये गवत, पालापाचोळा ई. अछ्यादनाचा वापर करावा. |
| डाळिंब | तेलकट डाग रोग नियंत्रण | तेलकट डाग रोग नियंत्रणासाठी झाडांची नैसर्गिकरीत्या पानगळ होई पर्यंत ताण द्यावा. पानगळ झालेल्या काड्याच्या शेंड्याकडील भाग वाळून जाई पर्यंत ताण द्यावा त्यामुळे काड्यांमधील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने तसेच उच्च तापमानामुळे डोळ्यांजवळ असणारे जीवाणू मारून जातील व पुढील बहारा मध्ये रोगाचे प्रमाण कमी होईल. बहार छाटणी करतेवेळी शेंड्याकडील १० ते १५ से.मी. लांबीचा भाग छाटून काढावा तसेच शिफारशीत खतांची मात्रा देवून नियमित पाणीपुरवठा करावा. |
| द्राक्ष्य | काढणी व विश्रांती अवस्था | सध्याच्या काढणी अवस्था संपण्याच्या वेळी माणसांमधील कोविड-१९ या संसर्गजन्य रोग व लॉकडाउन मुळे फळाच्या काढणीस अडथळा आल्या कारणाने शेतकरीबंधूनी आपले नुकसान टाळण्या करिता सध्याचा झाडावरील ताझा द्राक्ष माल झाडावरतिच बेदाण्या मध्ये परिवरतित करण्यासाठी उपाय योजना करावी. जर पूर्ण काढणी झाली असल्यास व पुढील १०-१५ दिवसांनी खरड छाटणी करण्याचे नियोजन असेल तर तद्पुर्वी जमिनीचे व पाण्याची अन्नद्रव्य व खताच्या नियोजनासाठी तपासणी करून घ्यावी. |
| केळी | | उष्णता वाढत असल्याने पिकला ड्रीप ने योग्य वेळेच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. झाडे पडू नयेत म्हणून गर्जेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना आधार द्यावा. झाडे लहान असतील तर बागेत अछ्यादनाचा वापर करावा. |
| फुल झाडे | | जरबेरा, कार्नेशन या फुल झाडावरील लाल कोळी या किडीच्या नियंत्रणासाठी डायकोफॉल १५ मिली किंवा अब्यमेक्टीन ४ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जंताच्या व विविध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/ टोचून घ्यावे. तसेच जनावरांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. जनावरे सावलीमध्ये / गोठ्यात बांधावीत. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : -
ठिकाण : कृ.म.वि., पुणे.
दि. : ०७.०४.२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**